भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २४.०८.२०१९ ते २८.०८.२०१९)

| अंक ६८/२०१९ | दिनांक २३.०८.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१७/०८/२०१९ ते २३/०८/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २४/०८/२०१९ ते २८/०८/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/०८ | १८/०८ | १९/०८ | २०/०८ | २१/०८ | २२/०८ | २३/०८ | दिनांक | २४/०८ | २५/०८ | २६/०८ | २७/०८ | २८/०८ |
| ४.८ | ०.० | १७.० | ०.० | १२.४ | १०.६ | ७.५ | पाऊस (मि. मी) | १६ | ३३ | २७ | ३१ | ३१ |
| ३२.० | ३२.० | ३१.५ | ३१.५ | ३२.० | ३२.० | ३२.० | कमाल तापमान (अं. से) | ३२ | ३१ | ३१ | ३० | ३१ |
| २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ४ | ४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९२ | ९६ | ९६ | ९५ | ९५ | ९७ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ९६ | ९६ | ९६ | ९५ |
| ६६ | ७२ | ८० | ८० | ६६ | ६६ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६६ | ७२ | ७९ | ८२ | ७८ |
| ०.९ | ०.४ | ०.५ | ०.३ | ०.० | ०.५ | १.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००४ | ००६ | ००८ | ००७ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | दक्षिणे कडून | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून | दक्षिणे कडून |
| दक्षिणे | स्थिर | नैऋत्ये | स्थिर | पश्चिमे | दक्षिणे | पश्चिमे | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ३४८०.२ | ३४८०.२ | ५२.३ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पोटरी ते लोंबी | या आठवड्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी भात पिकाच्या हळव्या जाती पोटरी ते लोंबी बाहेर येण्याच्या अवस्थेत असल्याने शेतामध्ये पाण्याची पातळी ५ ते १० से.मी. ठेवावी.<br>पावसाने ऊघडीप दिल्याने काही ठिकाणी भातावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळुन आला असुन निळे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस ४० मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १२.५ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन पावसाची उघडीप पाहून फवारावे.<br>भात पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास आवश्यकतेनुसार ट्रायसायक्लॅझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लि. पाण्यातुन फवारावे. |
| नागली | फुटवे | लावणी करुन एक महिना झालेल्या नागली पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा ८०० ग्रम युरियाच्या स्वरुपात द्यावा.<br>नत्र खताचा दुसरा हप्ता देण्यासाठी पावसाची ऊघडीप मिळाली असुन ४० किलो नत्र प्रती हेक्टरी लावणीनंतर १ महिन्यानी पिक फुटवे अवस्थेत असताना द्यावा. पिकाची बेणणी व खुरपणी केल्यानंतर दुसरी मात्रा द्यावी. विशेषतः लावणीपासुन २५ ते ३० दिवसांपर्यंत तण नियंत्रणावर जास्त लक्ष ठेवावे. |
| भुईमुग | फुलोरा | भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे ऊत्पन्न वाढते. |
| आंबा | - | आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३% (३० ग्रम/१० ली. पाणी) किंवा ०.१% बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठ्या फांद्यामधून डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासुन त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांद्या, बांडगुळे कापून घ्यावीत व त्या ठिकाणी १% बोर्डो मिश्रण लावावे.<br>आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास नियमित फळधारणेसाठी कलमांना १५ जुलै ते ३१ ऑगस्ट या दरम्यान १० वर्षावरील कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे. पॅक्लोब्युट्राझॉल हे झाडाच्या आकारमानानुसार व पसारा मोजुन द्यावयाचे असल्याने झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर पसा-याचा व्याज मोजावा. उदा- पुर्व- पश्चिम व्यास ५ मिटर व दक्षिण-उत्तर व्यास ३ मिटर म्हणजे सरासरी व्यास ४ मिटर होईल. २३% पॅक्लोब्युट्राझॉल घटक असलेल्या रसायनातुन द्यावयाचे असल्याने प्रती मिटर व्यासास ३ मिलि प्रमाणे १२ मिलि कल्टार द्यावे. प्रत्येक झाडाला पॅक्लोब्युट्राझॉलची मात्रा घेउन ३ ते ६ लिटर पाण्यात मिश्रण तयार करावे व खताच्या रिंगेच्या आतल्या बाजुस १५ सेमी खोलीचे २५ ते ३० खड्डे खणावे प्रत्येक खड्ड्यात १०० मिली याप्रमाणात पॅक्लोब्युट्राझॉल ओतावे आणि खड्डे बुजवुन घ्यावेत. पॅक्लोब्युट्राझॉल देण्यापुर्वी व नंतर झाडाभोवती असलेले गवत काढुन घ्यावे. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी व पाऊसाची उघडीप बघुन पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ १ मिलि/१लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढुन झाडातील रोठ्याला बाहेर काढुन मारुन टाकावे व तो भाग २०%प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५०मी.लि.१० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |
| नारळ व सुपारी | फळधारणा | डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळ व सुपारी फळपिकांना खताची मात्रा द्यावी. जास्त पावसाच्या वेळी खते देऊ नयेत. या आठवड्यात पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याने खताची मात्रा लवकरात लवकर द्यावी. |
| भाजीपाला | फळधारणा | फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसीत केलेले क्यु ल्युर युक्त रक्षक सापळे हेक्टरी चार याप्रमाणात लावावेत.<br>नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे.वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुटपालन | - | बहुवर्षीय स्वरुपाच्या वैरणीच्या पिकांची उदा. पॅरॅग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी.<br>कोंबड्यांचे पावसापासुन व ऊन्हापासुन योग्य ते संरक्षण करावे. कोंबड्याना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याचा पुरवठा करावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविदया महाविदयालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. बळवंत ना. सावंत<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|